स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.विद्यापीठाच्या मानव्यविद्या शाखेतील अर्थशास्त्र विषयातील पीएच.डी.पदवीसाठी विद्यापीठाकडे सादर करावयाचा

• संशोधन पूर्व आराखडा•

संशोधन विषय

"महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेच्या सामाजिक व आर्थिक लाभाचा अभ्यास"- विशेष संदर्भ लातूर जिल्हा

• संशोधक•

अंबुलगे शिवशक्ती शिवानंद

• मार्गदर्शक•

प्रा.डॉ. अनिल दिगंबर वाडकर

अर्थशास्त्र विभाग प्रमुख

श्री कुमारस्वामी महाविद्यालय, औसा जि. लातूर

• संशोधन केंद्र •

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ उप परिसर,पेठ- लातूर

डिसेंबर-२०२४

"महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेच्या सामाजिक व आर्थिक लाभाचा अभ्यास"- विशेष संदर्भ लातूर जिल्हा

प्रस्तावना

जगामध्ये चीन नंतर भारत हा लोकसंख्येच्या बाबतीत दुसऱ्या क्रमांकाचा देश आहे जागतिक एकूण भू-क्षेत्रफळाच्या 2.4% क्षेत्र भारताकडे आहे. तर जागतिक एकूण लोकसंख्येच्या सुमारे 18%(145 कोटी) लोकसंख्या भारतामध्ये वास्तव्यस आहे. अत्यल्प भूक्षेत्रफळ व प्रचंड वाढती लोकसंख्या यामुळे आर्थिक विकल्पावर अवाजवी ताण पडत आहे. वाढत्या लोकसंख्येमुळे पर्यावरणाचा ऱ्हास, रोगराई, अस्वच्छता, कचऱ्याचे ढीग, बालमृत्यू , माता मृत्यू, अंधश्रद्धा, सामाजिक अशांतता, अन्नधान्याची टंचाई,शिक्षण, बेकारी, दारिद्र्य, कुपोषण, सामाजिक व आर्थिक विषमता, गुन्हेगारी यासारख्या गंभीर समस्या भारतासारख्या विकसनशील राष्ट्रांसमोर आव्हानात्मक उभ्या आहेत.

वाढत्या लोकसंख्येमुळे, सदोष प्रशासकीय धोरणाच्या अवलंबनामुळे अनेक पर्यावरणीय प्रश्न व मानव विकास केंद्रित प्रश्न निर्माण झालेले आहेत. महाकाय लोकसंख्येच्या बेजबाबदार वर्तणुकीमुळे अस्वच्छ पर्यावरण, कचऱ्याचा प्रश्न, सांडपाण्याचा प्रश्न, प्रदूषणात वाढ ,लोकांची बदलती जीवनशैली, अन्न उपलब्धतेसाठी विविध पेस्टीसाईडचा उपयोग यातून विविध साथीच्या व गंभीर रोगाची उत्पत्ती होत आहे. परिणामी मानवी आरोग्य धोक्यात आले आहे. एकीकडे दूषित हवामान व मानवी जीवनशैली यातून आरोग्य धोक्यात आले आहे. तर दुसरीकडे वाढत्या लोकसंख्येला पर्याप्त जीवन जगण्यासाठी आवश्यक पायाभूत सुविधांची कमतरता, भांडवली साधनांची कमतरता, भ्रष्टाचार,परिणामी बेरोजगारी यातून दरडोई उत्पन्न कमी, लोकांची क्रयशक्ती कमी, परिणामी निकृष्ट जीवनमान व अनारोग्याची स्थिती निर्माण होते. परिणामी सामाजिक व आर्थिक विकास साध्य करण्यामध्ये उच्च मानवी भांडवला अभावी अनेक मर्यादा निर्माण होतात.

एकविसाव्या शतकात प्रत्येक राष्ट्र जागतिक पातळीवर आर्थिक मक्तेदारी निर्माण करू इच्छित आहे. परिणामी विकसित राष्ट्र अधिक श्रीमंत तर विकसनशील राष्ट्र तुलनेत गरीब होत आहेत. त्यातून प्रचंड प्रमाणात आर्थिक व साम्पतिक विषमता निर्माण झाली आहे. भारतामध्ये 2011 च्या शासकीय अहवालातील आकडेवारीनुसार 21.9% लोक दारिद्र्यरेषेखाली होते. वास्तविकता जवळजवळ 40% लोकसंख्या दारिद्र्यरेषेखाली जीवन जगत आहे. त्यांच्या मूलभूत गरजा अजूनही (अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण, आरोग्य, वीज इत्यादी) पूर्ण झाल्या नाहीत. लोकांच्या मूलभूत गरजेपैकी अत्यंत महत्त्वाची एक गरज म्हणजे सुदृढ व निरोगी आरोग्य होय.

ज्या राष्ट्रातील लोकसंख्येचे सुदृढ व निरोगी आरोग्य तर त्या राष्ट्रात कुशल मनुष्यबळ पर्याप्त प्रमाणात होते. परिणामी अशा राष्ट्राचा विकास अत्यंत जलद गतीने होतो व हे राष्ट्र आर्थिक

दृष्ट्या बलशाली बनतात. वैश्विक पातळीवर आरोग्य विषयक समस्येचे निराकरण करण्यासाठी जागतिक आरोग्य संघटना(who) 1948 पासून अत्यंत महत्त्वपूर्ण व विस्तारित कार्य करत आहे. ही संयुक्त राष्ट्राची एक विशेष संस्था आहे जी जागतिक सार्वजनिक आरोग्यासाठी जबाबदार आहे याचा उद्देश जगातील सर्व लोकांसाठी आरोग्याची उच्च संभाव्य पातळी गाठणे आहे साथीच्या व स्थानिक रोगांच्या नियंत्रणास मदत करणे, सार्वजनिक आरोग्य, रोगांचे वैद्यकीय उपचार व शिक्षण, प्रशिक्षण इत्यादीसाठी प्रोत्साहन देणे, वैद्यकीय व्यवस्था सुधारणे हा आहे. जगभरातील असुरक्षित लोकांना मदत करताना आरोग्य व सुरक्षिततेला प्रोत्साहन देणे हे who चे अधिकृत उद्दिष्ट आहे. या संघटनेअंतर्गत पोलिओचे समूळ उच्चाटन, इबोला लस विकसित करणे, एचआयव्ही, एड्स, इबोला, मलेरिया आणि क्षयरोग यासारख्या संसर्गजन्य रोगाचा समूळ नायनाट करणे तसेच हृदयरोग, कर्करोग, निरोगी आहार, पोषण व अन्नसुरक्षा, व्यवसायिक आरोग्य, मादक पदार्थांचा गैरवापर, इत्यादी आजारावर सेवा प्रदान करणे यासाठी जागतिक आरोग्य संघटने अंतर्गत सदस्य राष्ट्रांच्या योगदानाद्वारे निधी दिला जातो. तसेच खाजगी देणगीदार देखील यासाठी भरभरून आर्थिक मदत करतात. जागतिक आरोग्य संघटने अंतर्गत वैश्विक आरोग्यासाठी वर्ष 2020 - 21 चे एकूण मंजूर बजेट 7.2 बिलियन डॉलर पेक्षा जास्त होते.तर वर्ष 2022- 23 साठी 6.2 बिलियन डॉलर पेक्षा जास्त बजेट मंजूर करण्यात आली होते. वर्ष 2024 -25 साठी 6.83 बिलियन डॉलर बजेट मंजूर करण्यात आले आहे. यावरून जागतिक आरोग्य संघटना वैश्विक पातळीवर आरोग्याच्या बाबतीत किती जागृत आहे हे लक्षात येते.

भारतामध्ये स्वातंत्र्य प्राप्तीनंतर 1950 ला नियोजनाचा स्वीकार करण्यात आला विविध पंचवार्षिक योजनेच्या माध्यमातून देशात आरोग्यविषयक सुविधांची वाढ व विस्तार करण्यासाठी भारत सरकारने विविध प्रयत्न केले आहेत. अलीकडे 2005 मध्ये जननी सुरक्षा योजना, मिशन इंद्रधनुष्य- 2014, पीएम सुरक्षित मातृत्व अभियान- 2016, राष्ट्रीय बाल आरोग्य कार्यक्रम, पोषण अभियान- 2018, प्रधानमंत्री मात्र वंदन योजना, राष्ट्रीय आरोग्य अभियान-2013, आयुष्मान भारत (प्रधानमंत्री जन आरोग्य योजना), डिजिटल मिशन इत्यादी योजनेच्या माध्यमातून देशातील व्यक्तीच्या आरोग्याच्या स्थितीत सुधारणात्मक बदल करण्याचे कार्य भारत सरकारने केले आहे.

भारतामध्ये वर्ष 2014-15 मध्ये GDP च्या 1.13 % आरोग्य सेवेवर खर्च केल्याचे निदर्शनास येते.वर्ष 2021-22 मध्ये भारताचा एकूण आरोग्य खर्च रु. 9,04,461 कोटी, जीडीपीच्या 3.83% होता.म्हणजेच वर्ष2021-22 मध्ये दरडोई खर्च रु. 6,602 इतका होता.त्याचबरोबर पंचायत समिती व नगरपालिकांच्या माध्यमातून पिण्यायोग्य पाणी,

आरोग्य व स्वच्छता, कुटुंब कल्याण, महिला व बालविकास,समाज कल्याण विभाग याद्वारे मोठ्या प्रमाणात निरोगी आरोग्यासाठी प्रयत्न केले जात आहेत.

वर्ष 2021 च्या मानव विकास अहवालानुसार भारताचा मानव विकास निर्देशांक 0.644 इतका आहे. जागतिक 193 देशाच्या क्रमवारीत 134 वा नंबर लागतो. या अहवालानुसार भारतात सरासरी जगण्याचे वय 67.7 वर्ष इतके आहे. वर्ष 2024 मध्ये जागतिक भूक निर्देशांकानुसार 126 देशापैकी भारताची क्रमवारी ही 105 वर होती तर भूक निर्देशांकाचा स्कोअर हा 27.3 इतका होता हा अत्यंत गंभीर आहे. देशातील गरिबांसाठी पोषण व आहार हे पर्याप्त प्रमाणात उपलब्ध नाही. यावरून देशातील आरोग्याची स्थिती किती दयनीय आहे हे लक्षात येते. आर्थिक सर्वेक्षण वर्ष 2022- 23 नुसार भारतामध्ये प्रतिव्यक्ती प्रति दिवस 568.8 ग्रॅम अन्नधान्याची उपलब्धता आहे. सरकारद्वारे आरोग्याची स्थिती सुधारण्यासाठी अनेक प्रयत्न केले जात असले तरी अजूनही भारतातील आरोग्यविषयक सुविधा व स्थिती लोकसंख्येच्या प्रमाणात फारशी सुधारलेली नाही.त्यामुळे हा सामाजिक व आर्थिक विकासाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वपूर्ण संशोधनाचा विषय ठरतो.

महाराष्ट्र हे एक देशातील प्रगत राष्ट्र आहे. महाराष्ट्राला देशाची आर्थिक राजधानी मानली जाते. जवळपास प्रमुख बँका, वित्तीय संस्था, विमा कंपन्या, मॅच्युअल फंड मुख्यालय मुंबई सारख्या शहरात आहेत. आशियातील सर्वात जुने रोखे बाजार या शहरात आहे. वर्ष 2021-22 मध्ये जीडीपी चा विकासदर हा १२ टक्के होता. तर राज्यातील अर्थव्यवस्थेत कृषी उद्योग व सेवा क्षेत्राचा अनुक्रमे 13.2% 26.8% व 60 टक्के वाटाहोता. राज्यामध्ये बेरोजगारीचा दर 4.3% असून, ग्रामीण दारिद्र्य 11.49% व शहरी दारिद्र्य 3.7% आहे. महाराष्ट्रातील बहुआयामी दारिद्र्याचा निर्देशांक 5.40% आहे. यावरून राज्यातील लोकसंख्येच्या सामाजिक व आर्थिक स्थितीचा अंदाज येतो.

राज्यातील लोकसंख्येचा आरोग्यविषयक दर्जा, त्यांना मिळणाऱ्या आरोग्य सेवांची उपलब्धता, पोषण,आहार, रुग्णालय व चिकित्सक सेवा व त्यांची गुणवत्ता, लसीकरणाचा दर रुग्णाचा दर मृत्यू दर लक्षात घेऊन, आरोग्य विषयक सुविधेपासून राज्यातील कोणतीही व्यक्ती वंचित राहू नये यासाठी महाराष्ट्र सरकारने महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना 02 जुलै 2012 पासून प्रायोगिक तत्त्वावर प्रथमता 08 जिल्ह्यांमध्ये सुरू केली. 21 नोव्हेंबर 2013 पासून महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यांमध्ये या योजनेचा विस्तार करण्यात आला. ही योजना सुरुवातीला कमी उत्पन्न गटातील कुटुंबासाठी सुरू करण्यात आली. पण नंतर वेळोवेळी इतर लाभार्थी घटक/ गट यामध्ये समाविष्ट करण्यात आले. महाराष्ट्रामध्ये महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना व आयुष्यमान भारत योजना या योजना एकत्रितपणे अलीकडच्या काळात राबवली जात आहे. या योजनेकरिता होणाऱ्या खर्चामध्ये भारत सरकार

व महाराष्ट्र शासन यांचा हिस्सा 60: 40 या प्रमाणात आहे. 26 फेब्रुवारी 2019 च्या शासन निर्णयाद्वारे महात्मा फुले जन आरोग्य योजनेच्या 996 उपचाराकरिता प्रती कुटुंब प्रति वर्ष 1.50 लक्ष रकमेचे विमा संरक्षण पुरवले जात होते. तसेच आयुष्मान भारत या योजनेतून 1209 उपचारासाठी प्रति कुटुंब प्रति वर्ष 05 लक्ष रकमेचे आरोग्य संरक्षण लागू आहे. अलीकडच्या काळात महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत उपचाराची खर्च मर्यादा 2.5 लाखापर्यंत वाढविण्यात आली आहे.

महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत जळीत व्यक्ती, हृदयरोग शस्त्रक्रिया व उपचार, अकस्मित सेवा, त्वचारोग, अंतस्त्राव संस्थेचे विकार, कान ,नाक व घसा रोग, सर्वसाधारण औषधशास्त्र चिकित्सा, कर्करोगावरील उपचार व औषधोपचार, नवजात व बालरोग वैद्यकीय व्यवस्थापन, मूत्रपिंड विकार, मज्जातंतूचे विकार, मज्जातंतूच्या विकारावरील शास्त्रक्रिया, स्त्री रोग व प्रसुती शास्त्र, नेत्ररोग शस्त्रक्रिया, अस्थी व्यंग शस्त्रक्रिया, बालरोग शास्त्रक्रिया, प्लास्टिक सर्जरी, आकस्मित वैद्यकीय उपचार, कृत्रिम अवयव उपचार, फुफुसांच्या आजारावर उपचार, किरणोत्सर्गाद्वारे कर्करोग चिकित्सा, संधिवात संबंधी उपचार, जठर व अंतर विकाराच्या शस्त्रक्रिया, मानसिक आजार, जबडा व चेहऱ्याच्या अस्थी वरील शस्त्रक्रिया अशा प्रकारच्या एकूण 1356 आरोग्य सेवांचा उपचार या योजनेअंतर्गत केला जातो.

योजनेअंतर्गत पात्र लाभार्थ्यांसाठी अंगीकृत रुग्णालयांना दिल्या जाणाऱ्या पॅकेजेसच्या दरामध्ये सर्वसाधारण वाढ, परिचारिका शुल्क, विशेषतज्ञ, भुलतज्ञ, वैद्यकीय अधिकारी यांचे शुल्क, तपासणी शुल्क, ऑक्सिजन, ऑपरेशन थिएटर व अतिदक्षता शुल्क, शस्त्रक्रियेसाठी लागणाऱ्या साहित्याची किंमत, औषधे व द्रव्य कृत्रिम अवयवांची किंमत, इन प्लांट व एक्स-रे, निदान चाचण्या, अंतर रुग्णास भोजन, प्रवासी बस दरानुसार किंवा रेल्वेचे द्वितीय श्रेणी भाडेनुसार रुग्णालय ते रुग्णाच्या निवासस्थानापर्यंत वाहतूक खर्च. इत्यादी खर्चाचा समावेश या योजनेमध्ये होतो. या योजनेमध्ये रुग्ण रुग्णालयात दाखल झाल्यापासून ते घरी जाईपर्यंतच्या तसेच उपचारादरम्यान काही गुंतागुंत झाल्यास त्या सर्व खर्चाचा अंतर्भाव आहे. लाभार्थ्यास सर्व सेवा शुल्क पुरवला जातो. जर रुग्णाचा मृत्यू झाला तर रुग्णाचा मृतदेह रुग्णालयातून घरापर्यंत घेऊन जाण्यापर्यंतचा सर्व खर्च या योजनेमधून केला जातो.

महात्मा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत शासकीय व खाजगी अशा दोन्ही प्रकारच्या रुग्णालयांचा समावेश होतो. शासकीय रुग्णालयांमध्ये सार्वजनिक आरोग्य विभाग, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्य विभाग, महानगरपालिका, नगरपालिका यांच्या अख्त्यारातील रुग्णालयांचा समावेश होतो. तसेच विशेष अटीसह अनेक खाजगी रुग्णालयांचा देखील समावेश योजनेअंतर्गत करण्यात आले आहे. अंगीकृत रुग्णालयाची कमाल संख्या 1000 इतकी

असून, सद्यस्थितीत 999 रुग्णालय अंगीकृत आहेत. त्यापैकी 282 शासकीय रुग्णालये तर 717 खाजगी रुग्णालयांचा समावेश आहे.

या योजनेअंतर्गत महाराष्ट्रातील रहिवासी असलेले पिवळी, केसरी,अंत्योदय अन्न योजना व अन्नपूर्णा शिधापत्रिकाधारक कुटुंबे हे लाभार्थी असतील. तसेच शुभ्र शिधापत्रिका धारक शेतकरी कुटुंबे, कोणत्याही प्रकारची शिधापत्रिका नसलेली परंतु महाराष्ट्राचे अधिवास प्रमाणपत्र असलेली कुटुंबे, शासकीय शासनमान्य अनाथाश्रमातील मुले, शासकीय शासनमान्य आश्रम शाळेतील विद्यार्थी, शासकीय शासनमान्य महिला आश्रमातील महिला, शासकीय शासनमान्य वृद्धाश्रमातील जेष्ठ नागरिक, माहिती व जनसंपर्क कार्यालयाकडील निकषानुसार पत्रकार व त्यांच्यावर अवलंबित असलेले कुटुंबातील सदस्य, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळातील नोंदणी जीवित बांधकाम कामगार व त्यांची कुटुंबे तसेच महाराष्ट्रातील कोणत्याही रस्त्यावर अपघात ग्रस्त झालेला महाराष्ट्र/ भारताबाहेरील रुग्ण, विशेषतः महाराष्ट्र कर्नाटक सीमेवरील बेळगाव, कारवार, कलबुर्गी आणि बिदर जिल्ह्यातील 865 गावातील अंत्योदय अन्न योजना(AYY) प्राधान्य गट (PHH) अन्नपूर्णा योजना या योजनांचे नोंदणीकृत कुटुंबे व व्यक्ती या योजनेअंतर्गत आरोग्य विषयक सेवांचा लाभ घेऊ शकतात.

वर्ष 2018 ते 2022 या कालावधीत महाराष्ट्रामध्ये 27,04,170 आरोग्यविषयक सेवेच्या प्रकरणांना उपचार पूर्व मान्यता देण्यात आली व त्यावर एकूण 6327,39,65,066 रुपये इतका उपचार पूर्वक खर्च मंजूर करण्यात आला. 2018 ते 2022 या कालावधीमध्ये 26,96,644 रुग्णावर शस्त्रक्रिया उपचार करण्यात आले. शस्त्रक्रिया व उपचार योजनेअंतर्गत 3612,03,43,015 रुपये इतका खर्च करण्यात आला. तसेच या कालावधीत अदा प्रकरणांची संख्या 24,28,427 इतकी होती. तर यावरील खर्च 5184,44,05,573 रुपये असल्याचा दिसून येतो. या योजनेच्या माध्यमातून महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यातील अत्यंत गरीब व सर्वसामान्य कुटुंबांना व्यक्तींना आरोग्य विषयक सेवा व उपचार याचा लाभ घेणे शक्य होते. या योजनेमुळे लोकांचे जीवन निरोगी बनत आहे. परिणामी जीवनमानामध्ये वाढ होत आहे.

महाराष्ट्रामध्ये मराठवाडा, विदर्भ, पश्चिम महाराष्ट्र, कोकण व उत्तर महाराष्ट्र असे पाच महत्वपूर्ण प्रादेशिक विभाग आहेत. मराठवाड्यामध्ये आठ जिल्हे असून त्यापैकी लातूर हा एक राज्याच्या महसुलाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वपूर्ण जिल्हा आहे. पूर्वीच्या उस्मानाबाद जिल्ह्याचे विभागणी होऊन 16 ऑगस्ट 1982 ला लातूर जिल्ह्याची निर्मिती झाली.लातूर शहर हे जिल्ह्याचे मुख्यालय असून महाराष्ट्र राज्यातील 16 व्या क्रमांकाचे मोठे शहर आहे. लातूर जिल्ह्याचे अक्षांश -रेखांश स्थान 17 ° 52 ‘उत्तर ते 18 ° 50’ उत्तर आणि 76 ° 18 ‘पूर्व दख्खनचे पठार 79 ° 12 ‘पूर्व आहे. समुद्रसपाटीपासून 631 मीटर (2,070 फूट) सरासरी

उंचीवर आहे. लातूरचा संपूर्ण जिल्हा बालाघाट पठार वर आहे, समुद्रसपाटीपासून 540 ते 638 मीटर उंच आहे. लातूर जिल्ह्यात बहुतांशी लोकसंख्या ग्रामीण व कृषी क्षेत्रावर अवलंबून आहे.

लातूर जिल्हा नांदेड जिल्ह्याच्या ईशान्येकडे बद्ध आहे; पूर्व आणि आग्नेयला कर्नाटक राज्याची सीमा आहे; नैऋत्येस उस्मानाबाद जिल्हा; पश्चिमेला बीड जिल्हा; आणि – उत्तर – पश्चिमेस परभणी आहे.जिल्हा लातूर जिल्ह्याचे क्षेत्रफळ 7157 चौरस किलोमीटर असून ते महाराष्ट्र राज्याच्या 2.32% व औरंगाबाद विभागाच्या 11.4% आहे. जिल्ह्यामध्ये 10 तालुके व 05 महसुली उपविभाग आहेत. वर्ष 2011 च्या जनगणनेनुसार लातूर जिल्ह्याची एकूण लोकसंख्या 24,54,196 इतके आहे. जवळपास 74.53% लोक ग्रामीण भागात तर शहरी भागात 25.46% लोक वास्तव्यास आहेत. लातूर जिल्ह्यामध्ये वर्ष 2022- 23 मध्ये आरोग्य विषयक सेवा अंतर्गत रुग्णालये -31, दवाखाने-10, प्राथमिक आरोग्य केंद्र -58, प्राथमिक आरोग्य उपकेंद्र- 260 असल्याचे निदर्शनास येतात.

महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत लातूर जिल्ह्यातील सरकारी क्षेत्रातील 16 हॉस्पिटल व खाजगी क्षेत्रातील 16 हॉस्पिटल अशा एकूण 32 नोंदणीकृत हॉस्पिटल अंतर्गत लाभार्थी आरोग्य विषयक सेवेचा लाभ घेऊ आहेत. या योजनेअंतर्गत एक नोव्हेंबर 2023 ते 11 नोव्हेंबर 2024 या चालू वर्षामध्ये 18,513 रुग्णावर सर्जरी व थेरपीज करण्यात आल्या वइतर आरोग्य विषयक सेवा देण्यात आल्या. यासाठी या योजनेअंतर्गत 48,73,77,150 रुपये खर्च करण्यात आला.

संशोधन विषयाचे महत्त्व

देशाच्या विकासामध्ये मानवी भांडवलाचे स्थान अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. तसेच विकास व श्रम पुरवठा यांचा अत्यंत निकटचा संबंध आहे. कुशल व निरोगी श्रम पुरवठा हे आर्थिक विकासाचे महत्त्वपूर्ण निर्देशक आहे. व्यक्तीला दीर्घ व निरोगी जीवन जगण्यासाठी त्याला रास्त दरामध्ये आरोग्य सेवा उपलब्ध होणे आवश्यक आहे. अलीकडच्या काळामध्ये बदलती जीवनशैली व पर्यावरणातील बदल यामुळे विविध गंभीर व साथीचे रोग निर्माण झाले आहेत.

लातूर जिल्ह्या हा सातत्याने पडणारे दुष्काळ व आवर्षण यामुळे ग्रस्त आहे. सरासरीपेक्षा कमी पर्जन्यमान या जिल्ह्यांमध्ये होते. परिणामी लोकांचे दरडोई उत्पन्न अत्यंत अल्प असून दारिद्र रेषेखालील लोकांचे प्रमाण अधिक आहे. दारिद्र, बेरोजगारी, कुपोषण, भूकबळी, माता मृत्यू, बालमृत्यू, विविध साथीच्या गंभीर रोगांचा प्रादुर्भाव या व यासारख्या अनेक कारणामुळे जिल्ह्यातील मानवी भांडवलाचा दर्जा निकृष्ट प्रतीचा होत आहे. परिणामी जिल्ह्यातील

बहुतांशी व्यक्ती व कुटुंबाचे सामाजिक व आर्थिक जीवनमान खालावते. याचा विकासावर निश्चितच प्रतिकूल परिणाम होतो.

लातूर जिल्ह्यातील बहुतांशी लोकांचे दरडोई उत्पन्न हे अत्यल्प असून राहणीमान सर्वसाधारण आहे. जिल्ह्याच्या आर्थिक विकासामध्ये कुशल मनुष्यबळ, सुदृढ श्रम पुरवठा यांचा समतोल साध्य करण्यासाठी, जिल्ह्यातील मानवी भांडवल उच्च प्रतीचे तयार होणे गरजेचे आहे. जिल्ह्यातील व्यक्तींना आरोग्य विषयक सुविधा वेळेत व पर्याप्त प्रमाणात उपलब्ध होण्याबरोबरच, कमी उत्पन्न असणाऱ्या व्यक्तीं पैस्या अभावी आरोग्य विषयक सुविधेपासून वंचित राहू नयेत यासाठी या योजनेचे अत्यंत महत्त्वपूर्ण योगदान लाभत आहे. यातूनच सामाजिक स्वास्थ्य व आरोग्याची स्थिती सुधारून देशाचा जलद गतीने आर्थिक विकास साध्य करणे शक्य होते.

सामाजिक निर्देशक म्हणून जिल्ह्यातील या योजनेचे लाभ घेत असलेल्या लाभार्थ्यांचे शिक्षण, आरोग्य, लिंग, लोकसंख्या वाढीचा दर, आरोग्याची स्थिती, जीवन जगण्याचे प्रमाण व वयोमान, तर आर्थिक निर्देशक म्हणून जिल्ह्यातील व्यक्तींच्या उत्पन्नाचे स्त्रोत, खर्चाचे मार्ग, दरडोई उत्पन्न, संपत्तीची समानता, दारिद्र्याच्या स्तर, उपलब्ध वैद्यकीय सुविधा व त्यावरील खर्च, विविध शासकीय योजनांचा लाभ या अनुषंगाने तसेच मानवी आरोग्य सुधारणे व अर्थव्यवस्थेत निरोगी व सुदृढ मानवी भांडवल उपलब्ध करणे गरजेचे आहे. या दृष्टीने संशोधनासाठी मी "महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेच्या सामाजिक व आर्थिक लाभाचा अभ्यास"- विशेष संदर्भ लातूर जिल्हा हा अभ्यास विषय निवडला आहे.

संशोधनाची उद्दिष्टे :-

प्रस्तुत संशोधन कार्याला योग्य दिशा प्राप्त होण्यासाठी काही उद्दीष्ट्ये निश्चीत करण्यात आली आहेत, ते पुढीलप्रमाणे आहेत.

1) महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेचे स्वरूप व रचना अभ्यासणे

2) महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेच्या सामाजिक लाभाचा अभ्यास करणे

3) महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेच्या आर्थिक लाभाच्या अभ्यास करणे

4) महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेचे मूल्यमापन करणे

5) महत्वपूर्ण निष्कर्ष काढणे व शिफारशी करणे

संशोधनाची गृहीते :-

प्रस्तुत संशोधन कार्यासाठी काही गृहीत परिस्थिती ग्राह्य धरण्यात आली आहे. त्यासंबंधीचे गृहीतके पुढीलप्रमाणे आहेत.

1) लातूर जिल्ह्यामध्ये महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत लाभार्थ्याची संख्या वाढत आहे.

2) महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत सामाजिक लाभ मिळत आहेत.

3) महात्मा ज्योतिबा फुले जन योजनेअंतर्गत आर्थिक लाभ प्राप्त होत आहेत.

4) लातूर जिल्ह्यामध्ये विविध तालुक्यात महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेच्या लाभार्थ्यांची संख्या सम प्रमाणात आहेच असे नाही.

5) या योजनेच्या कार्यप्रवणतेमुळे मानवी भांडवलाचे आरोग्य सुधारत आहे.

संशोधनाची पध्दती :-

संशोधन कार्यामध्ये संशोधन पद्धती हा अत्यंत महत्त्वाचा घटक असतो. प्रस्तुत संशोधनासाठी वर्णनात्मक व निदानात्मक संशोधन पद्धतीचा वापर करणार आहे. वास्तविक तथ्यांचे संकलन करण्यासाठी प्राथमिक तथ्य संकलन व दुय्यम तथ्य संकलन माहिती संकलनाच्या स्त्रोतांचा वापर करण्याचे निश्चित केले आहे.

अ) प्राथमिक तथ्य संकलन :-

लातूर जिल्ह्यातील "महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेच्या सामाजिक व आर्थिक लाभाचा अभ्यास" संशोधनात्मक अभ्यास करण्यासाठी प्राथमिक तथ्य संकलन पद्धतीत लाभार्थ्यांच्या मुलाखती, निरीक्षण तंत्र, अनुसूची चा वापर करून वास्तवदर्शी शाश्वत माहिती संकलित करणार आहे.

ब) दुय्यम तथ्य संकलन:-

प्रस्तुत संशोधन कार्यासाठी दुय्यम तथ्य संकलन स्त्रोतांतर्गत, विविध शासकीय व निम शासकीय प्रकाशनाद्वारे प्रकाशित ग्रंथ, मासिके, पाक्षीके,साप्ताहिके ,वर्तमानपत्रे, संदर्भ ग्रंथ, विषयाच्या अनुषंगाने संबंधित शासन संस्थेचे वार्षिक अहवाल इत्यादीचा आधार घेतला जाईल.

नमुना निवड:-

महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेमुळे लातूर जिल्ह्यातील व्यक्ती व कुटुंबांना कोणत्या प्रकारचे सामाजिक व आर्थिक लाभ प्राप्त झाले आहेत याचा अभ्यास करण्यासाठी, प्रतिनिधीक गावाची निवड करण्यासाठी यादृच्छिक नमुना निवड पद्धतीचा वापर करण्यात येईल. निवड केलेल्या गावातील लाभार्थ्यांची लॉटरी पद्धतीने निवड करण्यात येईल. प्राप्त माहितीच्या आधारे संशोधन कार्य पूर्ण केले जाईल. जिल्ह्यातील दहा तालुक्यातील प्रत्येकी 40 लाभार्थी असे एकूण 400 लाभार्थ्यांचा अभ्यास प्रस्तुत संशोधन कार्यासाठी करणार आहे.

संशोधन कालावधी

महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेच्या सामाजिक व आर्थिक लाभाचा अभ्यास करण्यासाठी योजनेच्या आरंभापासून म्हणजेच वर्ष 2012 ते वर्ष 2025 या कालावधीत लातूर जिल्ह्यातील व्यक्ती व कुटुंबांना या योजनेमुळे प्राप्त झालेल्या सामाजिक व आर्थिक लाभाच्या अनुषंगाने तथ्य संकलन करून त्याचे वर्णनात्मक व निदानात्मक विश्लेषण करण्यात येईल.

संशोधन प्रबंधाची रूपरेषा:-

प्रस्तुत संशोधनासाठी कार्यासाठी पुढीलप्रमाणे प्रकरणांची रूपरेषा तयार करण्यात आलेली आहे.

प्रकरण -1 प्रस्तावना व संशोधन पद्धती

प्रकरण -2 महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेचे स्वरूप व रचना

प्रकरण -3 संशोधन साहित्याचे पुनरावलोकन

प्रकरण -4 लातूर जिल्हा दृष्टीक्षेपात

प्रकरण -5 महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेच्या सामाजिक लाभाचे अध्ययन

प्रकरण -6 महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेच्या आर्थिक लाभाचे अध्ययन

प्रकरण -7 निष्कर्ष व शिफारशी

प्रकरण -1 प्रस्तावना व संशोधन पद्धती

प्रस्तुत प्रकरणांमध्ये संशोधन विषयाच्या अनुषंगाने मानवी भांडवल व आर्थिक विकास, श्रम पुरवठा व आर्थिक विकास, लोकसंख्येचे सुदृढ व निरोगी जीवनमान आणि सामाजिक प्रबलता, वैश्विक पातळीवरील मानवी आरोग्य संवर्धनाच्या योजनांची संक्षिप्त कार्यप्रवणता, भारतातील आरोग्य विषयक धोरणांचा व योजनांचा संक्षिप्त आढावा, महाराष्ट्रातील आरोग्य विषयक धोरणे व योजना, महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना व आयुष्यमान भारत या एकत्रित योजनेची कार्यप्रवणता, मानवी भांडवलाचे निरोगी व सुदृढ आरोग्य आणि सामाजिक व आर्थिक विकास या अनुषंगाने सैद्धांतिक विश्लेषण, प्रस्तुत संशोधन विषयाची शास्त्रीय पद्धतीने मांडणी करण्यासाठी संशोधन पद्धती व त्याचे विश्लेषण इत्यादी घटकांच्या साह्याने माहितीचे विश्लेषण करण्यात येणार आहे.

प्रकरण -2 महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेचे स्वरूप व रचना

प्रस्तुत प्रकरणांमध्ये महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेचा प्रारंभ, योजनेचे स्वरूप, रचना, वैशिष्ट्ये, आर्थिक प्रबंधन, लाभार्थ्यासाठी निकष व पात्रता, अमलबजावणी कार्यपद्धती, आर्थिक प्रबंधन, या योजनेअंतर्गत समाविष्ट शासकीय व खाजगी रुग्णालयांची संख्या व त्याचा आढावा, महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजने अंतर्गत विविध रोगांच्या उपचारासाठी नोंदणी केलेल्या व्यक्तींची संख्या, शस्त्रक्रिया व उपचार घेतलेले लाभार्थी, शस्त्रक्रिया व उपचारासाठी योजनेअंतर्गत मंजूर व खर्च करण्यात आलेली रक्कम, योजनेअंतर्गत आरोग्य विषयक उपचार घेण्यासाठी नोंदणी केलेले परंतु लाभ न घेतलेले लाभार्थी याची कारण मीमांसा, योजनेची व्याप्ती व सामाजिक आर्थिक विश्लेषण इत्यादी मुद्द्यांच्या आधारे प्रस्तुत प्रकरणांमध्ये अभ्यास करणार आहे.

प्रकरण -3 संशोधन साहित्याचे पुनरावलोकन

महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेच्या सामाजिक व आर्थिक लाभाच्या संशोधनात्मक अध्ययनामध्ये, मानवी भांडवलाचा गुणात्मक दर्जा सुधारण्यासाठी सुदृढ व निरोगी आरोग्य संवर्धन करण्यासाठी सरकारने राबवलेली धोरणे, योजना, त्याची कार्य निष्पन्नता, सरकारी व निम सरकारी संस्था यांची कार्यप्रवणता, लोकसंख्येच्या प्रमाणात आरोग्य सुविधांचा पुरवठा, राष्ट्राचे /राज्याचे/जिल्ह्याचे मानवी आरोग्य संवर्धनासाठी अर्थ प्रबंधन, लोकांचे उत्पन्न व आरोग्याची जपणूक, महाकाय साथीच्या रोगांची लागण अशा परिस्थितीत उपचार पद्धती व आरोग्य सेवा यांची कार्यपद्धती, आरोग्याची जपणूक व सामाजिक संवर्धन, मानवी आरोग्य व आर्थिक विकास, उच्च मानवी भांडवल व सुदृढ व निरोगी श्रम पुरवठा इत्यादी घटकाच्या अनुषंगाने झालेली संशोधने, सरकारी अहवाल, संशोधनात्मक लेख इत्यादीचे अध्ययन करून त्यामधून निघालेल्या निष्कर्षात्मक माहितीचे विश्लेषण करण्यात येणार आहे.

प्रकरण -4 लातूर जिल्हा दृष्टीक्षेपात

प्रस्तुत प्रकरणामध्ये लातूर जिल्ह्याची ऐतिहासिक पार्श्वभूमी, भौगोलिक स्थान व प्राकृतिक रचना, जिल्ह्यातील लोकसंख्या (घनता,ग्रामीण व नागरी लोकसंख्या, स्त्री-पुरुष प्रमाण, अनुसूचित जाती व जमाती, श्रमिक लोकसंख्या, साक्षरता), जिल्ह्यातील कृषी, उद्योग व सेवा क्षेत्र संक्षिप्त आढावा, रोजगाराची स्थिती, जिल्ह्याचे उत्पन्न, लातूर जिल्ह्यातील आरोग्य सेवा इत्यादी घटकांच्या अनुषंगाने माहिती संकलित करून, प्राप्त माहितीचे विश्लेषण करणार आहे.

प्रकरण -5 महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेच्या सामाजिक लाभाचे अध्ययन

प्रस्तुत प्रकरणांमध्ये महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेच्या सामाजिक लाभाच्या अनुषंगाने लातूर जिल्ह्यातील सामाजिक वर्ग विशेषता आर्थिक दृष्ट्या दुर्बल, मागासवर्गीय, आदिवासी, वंचित आणि महिला यांच्या योजनेअंतर्गत आरोग्य सेवेमधील समानता, योजनेची जनजागृती आणि साक्षरता, आरोग्य सुरक्षेची सुलभता, समान व न्यायपूर्ण आरोग्य सुविधांचे वितरण यासाठी सामाजिक धोरणात्मक बदल, जिल्ह्यातील शहरी व ग्रामीण भागातील लोकांच्या आरोग्य विषयक जीवनमानामध्ये झालेला बदल, योजनेची परिणामकारकता व सामाजिक मूल्यांकन या अनुषंगाने अनुसूची व मुलाखत तंत्राच्या साह्याने माहितीचे संकलन करून तथ्यांचे सादरीकरण व आलेखिय विश्लेषण करण्यात येणार आहे.

प्रकरण -6 महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेच्या आर्थिक लाभाचे अध्ययन

प्रस्तुत प्रकरणांमध्ये महात्मा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत सेवा प्रदान करणारे सरकारी व खाजगी रुग्णालये, आर्थिक लाभ घेणाऱ्या लाभार्थ्यांची संख्या,नोंदणीकेल्यानंतर योजनेअंतर्गत आरोग्य सेवा व उपचार तसेच शस्त्रक्रिया झालेल्या लाभार्थ्यांची संख्या, योजनेअंतर्गत जिल्ह्यातील लाभार्थ्यासाठी विविध आरोग्य सेवा , शस्त्रक्रिया व उपचारासाठी मंजूर करण्यात आलेला खर्च, लाभार्थ्यासाठी या योजनेअंतर्गत प्रत्यक्ष खर्च केलेली रक्कम, वित्तीय संरक्षण, स्वास्थ्य सुधारणा व कार्यक्षमता इत्यादी व या अनुषंगिक घटकाद्वारे अनुसूची व मुलाखतीच्या माध्यमातून माहितीची तथ्य संकलन करून विश्लेषण व आलेखीय सादरीकरण करण्यात येणार आहे.

प्रकरण -7 निष्कर्ष व शिफारशी

प्रस्तुत प्रकरणांमध्ये संशोधन विषयाच्या अध्ययनावरून, महत्त्वपूर्ण निष्कर्ष काढण्यात येणार आहेत. तसेच मानवी भांडवलाचा दर्जा उंचावण्यासाठी, राष्ट्राची सामाजिक व आर्थिक प्रबलता निर्माण करण्यासाठी योग्य त्या शिफारशी करण्यात येणार आहेत.

संदर्भ सुची :-

1. भारतीय अर्थव्यवस्था, गौरव दत्त/ अश्विनी महाजन, 71 वी आवृत्ती, एस चांद अँड कंपनी प्रायव्हेट लिमिटेड, नवी दिल्ली.

2. देसाई/भालेराव-भारतीय अर्थव्यवस्था,2013,निराली प्रकाशन,पुणे.

3. डॉ.जे.पी.मिश्रा -भारतीय अर्थव्यवस्था, 2018, प्रतियोगिता साहित्य सिरीज, साहित्य भवन, आग्रा.

4. संशोधन पद्धती प्रक्रिया व तंत्रे, आगलावे विद्या प्रकाशन नागपूर, 2000

5. 'संशोधन पद्धतीशास्त्र' डॉ. रा. र. बोरुडे , पुणे विद्यार्थी गृह प्रकाशन, पुणे 2005.

6. भारत 2014, माहिती व प्रसारण मंत्रालय, भारत सरकार.

7.वार्षिक अहवाल, वित्त मंत्रालय, भारत सरकार, 2022- 23

8. वार्षिक अहवाल, आर्थिक समीक्षा, भारत सरका,र 2022-23

9.वार्षिक अहवाल, महाराष्ट्राची आर्थिक पाहणी-2023, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई.

10.वार्षिक अहवाल, जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन-2023, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई

11.वार्षिक अहवाल 2022 -23, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय, महाराष्ट्र शासन

12.Annual report-2022-23 ministry of health and family welfare of India

13.Annual report-2021-22, United Nations and development

14.https://maharashtra.gov.in/Site/1566/Health%20and%20Wellness

15.https://www.jeevandayee.gov.in/MJPJAY/FrontServlet?requestType=CommonRH&actionVal=HomepageStats&pageName=HomepageStats

16.https://www.jeevandayee.gov.in/MJPJAY/FrontServlet?requestType=CommonRH&actionVal=RightFrame&page=undefined%3E%3E%3Cb%3EMJPJAY%3C/b%3E&pageName=MJPJAY&mainMenu=About&subMenu=MJPJAY

संशोधक

अंबुलगे शिवशक्ती शिवानंद

संशोधन मार्गदर्शक

प्रा.डॉ. अनिल दिगंबर वाडकर